# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २६/०७/२०२५


## मा. श्री.चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी घेतली नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाची आढावा बैठक उत्कृष्ट कामगिरी बद्दल नागपुर ग्रामीण पोलीसांचे केले कौतुक


आज दिनांक २६/०७/२०२५ रोजी मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री तथा पालकमंत्री नागपूर जिल्हा यांनी पोलीस भवन नागपुर येथे नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या कामकाजाबाबत आढावा बैठक घेतली. सदर बैठकीत मा. श्री. संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक ,नागपुर परीक्षेत्र , मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री विजय माहुलकर, पोलीस उपधिक्षक गृह, सर्व उपविभागिय अधिकारी आणि ईतर अधिकारी असे हजर होते.


**सणोत्सव बंदोबस्त/ उपाययोजनेंबाबत आढावाः—** मा. मंत्री महोदय यांनी आगामी येणाऱ्या जन्माष्टमी,गोपाळकाला,पोळा,गणेश,चतुर्थी(स्थापणा),अनंत चर्तुदशी (विर्सजन) या सणोत्सवाच्या कालावधीमध्ये कायदा व सुव्यवस्थेबाबत उपाययोजनेंचा आढावा घेतला. गणेश विसर्जनासाठीचे कृत्रिम तलावे याबाबतची सुध्दा माहीती देण्यात आली.


**अवैध धंदयावरील कारवाई बाबत आढावा :—** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलसांनी केलेल्या अवैध धंदयाबाबत च्या कारवाई बाबत माहीती सादर करण्यात आली. सर्व कारवाई मध्ये सन २०२३ आणि २०२४ च्या तुलनेत सन २०२५ मध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. अंमली पदार्थांच्या च्या कारवाईत सन २०२३ मध्ये १०, सन २०२४ मध्ये ३२ तर सन २०२५ जुन पर्यंत ३४२ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. रेती तस्करीच्या बाबतीत सन २०२३ मध्ये ७६ , सन २०२४ मध्ये २२१ तर सन २०२५ जुन पर्यंत २५० कारवाई करण्यात आलेल्या आहेत. अवैध जनावर तस्करीच्या बाबतीत सन २०२३ मध्ये ५७ , सन २०२४ मध्ये ७६ तर सन २०२५


जुन पर्यंत ८८ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. जुगार बाबतीत सन २०२३ मध्ये ४१४ , सन २०२४ मध्ये ३९३ तर सन २०२५ जुन पर्यंत ४२८ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. अवैध दारू बाबतीत सन २०२३ मध्ये १७०० , सन २०२४ मध्ये १८९२ तर सन २०२५ जुन पर्यंत १९९४ कारवाई करण्यात आलेल्या आहेत. तसेच प्रतिबंधत्मक कारवाई उदा. एम.पी.डी.ए., मोक्का , हद्दपार प्रस्ताव या बाबत सुध्दा माहीती सदर केली.




अवैध धंदयांवरील कारवाई – वाळु
३००
२५०
२००
१५०
१००
५०
०
७६
२२१
२५०
वाळु
२०२३
२०२४
२०२५


अवैध धंदयांवरील कारवाई – जनावराची अवैध वाहतुक
100
90
80
70
60
50
40
30
20
10
0
57
76
88
जनावराची अवैध वाहतुक
2023
2024
2025


अवैध धंदयांवरील कारवाई – जुगार
440
430
420
410
400
390
380
370
414
393
428
जुगार
2023
2024
2025


अवैध धंदयांवरील कारवाई – दारूबंदी
2050
2000
1950
1900
1850
1800
1750
1700
1650
1600
1550
1700
1892
1994
दारूबंदी
2023
2024
2025

## प्रतिबंधक कारवाई

| सन | MPDA | हद्दपार प्रस्ताव | MCOCA | PITA |
|---|---|---|---|---|
| २०२३ | ०६ | २३ | ० | ०६ |
| २०२४ | ०३ | ५३ | ० | ०५ |
| २०२५ | ०७ | ७२ | ०५ | ०८ |

**सेव लाईफ फाउंडेशन सोबत काम :—** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस यांनी सेव लाईफ फाउंडेशन सोबत सामजंस्य करार करून अपघात आणि प्राणांतिक अपघात कमी करण्यासाठी वेगवेगळया उपाययोजना करत आहे. सदर आढावा बैठकीमध्ये मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी नागपुर ग्रामीण जिल्हा चे अपघात आणि प्राणांतिक अपघात कमी करण्याचे प्रकल्पाचे "Nagpur Zero-Fatality District Programme" चे सादरीकरण केले. नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दला तर्फे जिल्हयातील ७ वेगवेगळया जागा जिथे सर्वात जास्त प्राणांतिक अपघाताचे प्रमाण होते तिथे रस्त्यामध्ये अभियांत्रिकी बदल केले गेले त्यामुळे तिथे प्राणांतिक अपघाताचे प्रमाण कमी झाले आहे. **जाने ते एप्रील २०२४ च्या तुलनेत जाने ते एप्रील २०२५ मध्ये प्राणांतिक अपघातचे प्रमाण १० टक्कयांनी तर अपघातचे प्रमाण ९ टक्कयांनी कमी झाले आहेत.**







**तपासमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा (AI) चा वापर :—** नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांनी MARVEL (**Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement**) अंतर्गत Crime OS या तंत्रज्ञानाचा तपासाची गती वाढवुन ,तपास काम शास्त्रोक्त, दर्जेदार होण्यासाठी तपासी अधिकारी यांना मदत होण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. यामध्ये सी.सी.टी.

व्ही फुटेज विश्लेषण सुध्दा केले जाते. तसेच यामधील खालील पाच **(AI) आधारीत प्रगत टुल्स्ची रचाना व अंमलबजावणी करण्यात आली आहे.**

१. चेहरा ओळख प्रणाली (Facial Recognization)

२. वस्तु ओळख (Object Detection)

३. नंबर प्लेट ओळख (ANPR)

४. ऑप्टीकल कॅरेक्टर ओळख ( OCR),

५. सी.डी.आर/ टी.डी.आर विश्लेषणासाठी चॅटबॉट हे टुल्स् पोलीस यंत्रणेत प्रत्यक्ष वापरात आणण्यात आले आहे.

**मा. मंत्री मोहदय यांनी सर्व कामगिरी बाबत नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांचे कौतुक केले आणि अशीच कामगिरी करीत राहण्याबाबत सुचना दिल्या.**


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

